
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)



ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - IV

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - IV


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | पर्यावरण समस्या व शाश्वत शेती विकास<br>**प्रा. डॉ. राम गौनेकर** | ५६-५८ |
| १५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातून प्रकटणारा शेतीविषयक दृष्टीकोन<br>**प्रा. विवेक भिकाभाऊ कोल्हे**<br>**प्रा. डॉ. देवराव नामदेवराव राठोड** | ५९-६२ |
| १६ | ग्रामीण भारतातील शेती क्षेत्रातील वाटचाल<br>**प्रा. डॉ. आरती वाल्मिकराव खडतकर** | ६३-६५ |
| १७ | कृषी अर्थशास्त्र<br>**प्रा. सुजाता आर. नाईक** | ६६-७१ |
| १८ | कृषि अर्थशास्त्र व संलग्न कार्ये<br>**प्रा. डॉ. किशोर एस. गोमेकर** | ७२-७८ |
| १९ | शेतकरी जीवनाचे ग्रामीण कवितेतील दर्शन<br>**प्रा. डॉ. श्याम मु. जाधव** | ७९-८३ |
| २० | भारतीय शेतीचा इतिहास<br>**डॉ. वैशाली भिवसेन भिसे** | ८४-८६ |
| २१ | कृषी रोजगार आणि महिला<br>**विशाल भिवसेन भिसे** | ८७-८८ |
| २२ | शेतकरी जीवनाचे साहित्यातील दर्शन : शेतकरी जीवनाचे ग्रामगीतेतून घडणारे दर्शन<br>**प्रा. अनुप अरुण नांदगावकर** | ८९-९२ |
| २३ | कृषी रोजगार आणि महिला<br>**कु. छाया पांडुरंग ढाकुलकर** | ९३-९६ |
| २४ | शेतकरी आत्महत्या : शेती क्षेत्रासमोरील गंभीर समस्या<br>**डॉ. पंकज मा. तायडे** | ९७-१०२ |
| २५ | पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्येचे वास्तव आणि त्यावरील उपाय<br>**डॉ. प्रसन्नजीत रा. गवई** | १०३-१०७ |
| २६ | कृषी रोजगार आणि महिला<br>**प्रा. डॉ. दीपक द. कोटूरवार** | १०८-११० |




207

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १४. पर्यावरण समस्या व शाश्वत शेती विकास

प्रा. डॉ. राम गौनेकर
मराठी विभाग प्रमुख, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.

अन्न,वस्त्र आणि निवारा या माणसाच्या तीन मूलभूत गरजा मानल्या जातात. तरीही या अत्यंतिक मूलतम गरजा नाहीत. यांच्या विना प्राण रक्षण होऊ शकते. प्राण रक्षणासाठी प्राणवायूची निलांत आवश्यकता असते. हा प्राणवायू भूतल व अंतरिक्ष संचारी आहे. यांच्या आवरणाने पृथ्वी मंडित आहे. प्राण, आपन, व्यान, उदान आणि समान या पंचप्राणांचा व पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचतत्वांचा अद्वैतभाव आहे.

पर्य+आवरण = पर्यावरण, पर्यावरण रक्षावरण- रक्षक व चयाक्षिती वर केवळ एकाचे आवरण नसून पाचांचे आवरण आहे. ही आवरणे माणूस जेवढी व जितकी स्वच्छ व शुध्द ठेवील, तितके त्याचे आयुरारोग्य दीर्घबली असेल.

माणसाच्या ' मी ' त्वाची व ' मम ' त्वाची कक्षा वाढल्या बुध्दीमुळे वेदाभ्यास हवी होती; तथापि बुध्दिवादाच्या पंकावर्तात नि:संशय रुतल्यामुळे तो ढोंगी, स्वार्थी, स्वैराचारी-दुराचारी-चंगळवादी बनला आणि स्वत:च स्वत:चा शत्रू ठरला आहे. या दुर्विलासी रसायनातूनच ' प्रकृती 'ची विकृती' माणसाने केली आहे.

या स्पर्धायुगात विज्ञानाच्या वरदानाने अनेकविध शोध लावून माणसाने आपले जीवन समृध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. यातून भौतिक झगमगाट रुंदावला आहे. जसे- विविध कारखाने, नगरे, महानगरे, दळणवळणाची वेगवान-अतिवेगवान साधने, अंतरिक्षगामी याने इत्यादी.

कारखान्यातील बहिर्गामी धुम्रवलये, त्यातील दुषित व मलीन जल यामुळे या 'वसुंधरे' वरील वायुतत्व, जलतत्व प्रदुषित झाले आहे. गंगेसारख्या पवित्रम तीर्थोदकाची क्रुर चेष्टा माणसाने केली आहे. हिमनगही तप्त- संतप्त होऊ पाहत आहेत. सप्तार्णव माणसाला जलमय करुन टाकून नंतर रुक्ष बनतील, असे चित्र दिसते. **शाश्वत शेतीविकास :** मानसाने शेतीचा शोध लावला नित्याची भटकंती थांबली. त्याच्या जीवनात स्थैर्य आले आहे. पुढे लोकसंख्यावाढीबरोबर अन्नधान्याची मागणी वाढली. परिणामी कृषीक्षेत्रात नवनविन प्रयोग सुरु झाले. रासायनिक खते आणि औषधी यांचा अतिवापर झाला. त्यातून जमिनीचा पोत बिघडला. पाण्याच्या अतिवापराने तिची प्रकृती ढासाळली. शाश्वतशेती विकासासाठी खालील बाबी कराव्या लागतील.

1.पाण्याचे योग्य नियोजन : पडणाऱ्या पाण्याचे नियोजन करुन पिके ठरवावी लागतील. जेथे जास्त पर्जन्यमान आहे, तेथे ऊस ,केळी अशी पिके घ्यावी लागतील. धरणातून पाटाने पाणी देण्याची पध्दत बंद



२०६

करुन, तुषार सिंचन व ठिबक सिंचन पध्दत वापरावी लागेल. माथा ते पायथा पाणी अडविणाऱ्या शास्त्रीय पध्दती कटाक्षाने राबवाव्या लागतील. त्यात जनसहभाग अतिशय महत्वाचा ठेवावा लागेल. शासनाच्या योजना या आमच्या योजना आहेत हा विश्वास जनतेला वाटणे गरजेचे आहे. त्यांच्या सहभागाशिवाय या योजना कुचकामी असतात. हा मागील सत्तर वर्षाचा अनुभव आहे.

२.पारंपरिक खतांचा विनियोग : पशू-पक्षापासून मिळणारे पारंपरिक खत वापरावे लागेल. त्या साठी त्यांना जपावे लागेल. त्यांच्या पासून केवळ खतच मिळते असे नाही ; तर नगदी पैसाही उपलब्ध होतो. म्हणून पुन्हा दारामध्ये पशू-पक्षांचा वावर वाढवा लागेल.

३. पारंपरिक बियाणांचा विनियोग : आपल्या शेतीतील उत्तम धान्यच बियाणे म्हणून वापरण्याचे कौशल्य आपल्या पूर्वजांकडे होते. कृषी विद्यापीठाच्या मदतीने ही बियाणे विकसीत करुन वापरता येतील. त्यात तज्ञ शेतकऱ्यांना सहभागी करुन घेण्यास हरकत नाही.

४.वनशेतीचा विकास :आपल्या देशात वेगवेगळया प्रदेशात वेगवेगळी वनराई आढळते. तिला विकसित करता येईल. उदा. डोंगराळ भागात चिंचबने तयार करणे सहज शक्य आहे. ज्यामुळे आर्थिक आणि पर्यावरणीय लाभ होईल. ''चिंचेच्या औषधी उपयोगाबाबत संस्कृत ग्रंथातही उल्लेख केलेला आढळतो ,''[१] असे प्राचीन संदर्भ देऊन या वृक्षांबद्दल शेतकऱ्यांमध्ये जागृती घडवून आणता येईल. कडूनिंबासारख्या महाऔषधी वृक्षांची वनराई करुन विकास करणे शक्य आहे. त्या साठी तज्ञांकडून योग्य प्रबोधनाची आवश्यकता आहे.' 'नारळाप्रमाणेच लिंबाचा प्रत्येक भाग सजीवाला उपयोगी आहे.''[२] असे डॉ .अंकुश जाधव अनुभवांती मत नोंदवतात. हे मत समाजाला समजावे लागेल.

५.जल व्यवस्थापन : घरातील संगणकाला किंवा हातातील मोबाईलला जशी माणसे जपतात तशी ती पाण्याला जपतील. त्यासाठी पाण्याला मीटर लाववेच लागेल. ' मोफत वस्तुचे मोल नसते' हा सिध्दांत येथे लावावा लागेल. तरच बदल शक्य आहे. शासनाने विविध योजना राबवूनही हा प्रश्न सुटत नाही. त्याचे कारण पाण्याचा अनिर्बंध वापर होय. '' पाणी हवे तसे वापरले जाते. ''[३] त्यास धरबंद अत्यावश्यक आहे.

६. नदी जोड प्रकल्प : उत्तर भारतात वर्षातून दोन वेळेस पुरांचा सामना करावा लागतो. पावसाळयातअतिवृष्टी, तर उन्हाळयात बर्फ वितळल्यामुळे ! हे पाणी दक्षिण भारतात आणावेच लागेल. ही काळाची गरज झाली आहे .पांडुरंग पाटणकर नदी विषयी म्हणतात, ''नदी साऱ्या जीवसृष्टीची 'जीवनदायिनी ' आहे.''[४] तिचे महत्व ओळखून तिचे शुध्दीकरण ही अपेक्षित आहे. कारखान्याचे मलीन पाणी नदीत येणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. कचऱ्याची विल्हेवाट नदीत करता कामा नये. प्रेताची राख टाकू नये. वा प्रेताची विल्हेवाट नदीत लावू नये.

याची कवीला खंत आहे. व्यवस्था व्यवस्थित राहावी यासाठी तो लेखणी चालवितो, 21व्या शतकला वंदन करतो आहे.

"तुकाराम,महात्मा फुले ध्यानी धरा
आंबेडकरी स्वाभीमान जागा करा
आठवा समर्थांचा विवेकी नारा" पृ.क्र.20

तुकोबारायांचा आणि महात्मा फुल्यांचा विचार शेतकऱ्यांच्या जीवनात स्थैर्य आणू शकतो. हा आशावाद कवीला आहे. बाबासाहेबांनी दिलेला स्वाभीमान मनामनात रूजावा आणि समर्थांचा विवेक मनाला प्रसन्न करून उत्तम कृती करेल असे कवीला वाटते. या महामानवाच्या विचाराने मानवाचा महामानव होऊ शकतो. असे कवी सूचवू पाहतो आहे.

जागतिकीकरणामुळे जग जवळ आले. विश्वाचा विस्तार झाला. माहितीचा महासागर झाला. दळणवळणाचे जाळे विणले गेले. या सर्वांच्या मुळशी मानवी कल्याणच होते; परंतु काही स्वार्थी माणसांनी याचा स्वार्थासाठी वापर केला. त्यामुळे त्यांची सुबत्ता वाढली. विलास वाढले. आणि सामान्यांचे जगणे खडतर झाले. म्हणून कवी म्हणतो –

"आज गोविंदा करूया
पुढाऱ्यांच्या संपत्तीची
आज दहीहंडी फोडू या" पृ.क्र.21

आजच्या बेकारीला, अस्थिरतेला आणि असुरक्षिततेला येथील राजकारणी कारणीभूत आहेत. असे कवीला वाटते.

माझ्या कवितेचा पिंडच ग्रामीण संस्कृतीवर पोसला आहे"[4] असे स्वतःकवीने कवितासग्रंहाच्या मनोगतात म्हटले आहे. ग्रामीण जीवनाशी कवी एकरूप झालेला आहे. जागतिकीकरणाने ग्रामीण जीवनाचे प्रचंड शोषण सुरू झाले. शोषक विधिनिषधशून्य झाले. त्यांचा चंगळवाद वाढला. यामुळे कवी अस्वस्थ होतो आणि ती अस्वस्थता त्यास लिहिते करते. शरणकुमार लिंबाळे म्हणतात,"विविध स्तरात पसरलेला आणि पोसलेला भ्रष्टाचार अजूनही साहित्याचा विषय होत नाही"[5] आज माणसे बोलतच नाही. 'मौनं सर्वार्थ साधनम्!' याचा वाच्यार्थ घेऊन ती केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. यामुळे समाजाचे अतोनात नुकसान होत आहे. हे टाळण्यासाठी कवी बोलतो आहे. मौनात राहणे त्यास मान्य नाही. माणसे रंग बदलतात, मुखवटे धारण करतात. कवी म्हणतो,

"तुझ्यात शोधत होतो वाल्मिकी, पण....
तू दाखवून दिलेस -- तुझयातील वाल्याकोळी" पृ.क्र.24

माणसांनी तत्व आणि व्यवहारात फरक केला. माझे ते माझे,इतरांचे तेही माझे या स्वार्थीपणामुळे सामान्य माणूस नागवला गेला. याची खंत कवीला आहे.



206